# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**दृष्टिनिबंध ऑक्टोबर - २०१९**

**सन २०२०-२३ करिता ठोक जल प्रशुल्क निर्धारणासाठीचा दृष्टिकोन**

(संपूर्ण राज्यातील जलसंपत्ती प्रकल्पांकरिता)

## १. पार्श्वभूमी :

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (संक्षिप्त 'अधिनियम') च्या कलम ११(घ) मध्ये अनिवार्य केल्यानुसार, प्रत्येक नदीखो-यातील लाभार्थींच्या किंवा उपभोक्त्यांच्या मतांची खात्री करुन घेतल्यानंतर जलसंपत्ती प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापन, प्रशासकीय, कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची (थोडक्यात वार्षिक परिचालन व परिरक्षण खर्च) वसुली परावर्तित होईल अशा त-हेने ठोक जलप्रशुल्क निर्धारणाची पध्दती ठरविण्याकरिता प्राधिकरणाने प्रक्रिया पार पाडणे अपेक्षित आहे.

प्राधिकरण उपखोरे, नदीखोरे अथवा राज्यस्तरीय यातील जे असेल त्यानुसार जलप्रशुल्क पध्दती ठरवील.

हा दृष्टिनिबंध "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे), मार्गदर्शक सूचना, २०१९ सोबत वाचावा.

## २. सल्लामसलतीची पध्दती :

सल्लामसलतीचे उद्देश, लाभार्थी व भागधारकांचे वैविध्य , विषयाची गुंतागुंतीची रचना आणि तांत्रिक, सामाजिक तसेच विषयाचे आर्थिक दृष्टीकोन विचारात घेऊन सल्लामसलतीची पध्दत ठरवली जाते.

सल्लामसलत प्रक्रिया दोन टप्प्यांत पार पाडली जाईल. पहिल्या टप्प्यात निवडक तज्ञ समूहासमवेत सल्लामसलत करण्यात येईल. त्यानंतर दुस-या टप्प्यात लाभार्थी जनतेसमवेत सल्लामसलत केली जाईल.

विषयाची पार्श्वभूमी, प्रस्तावाचा मसुदा आणि इतर संबंधित माहिती असलेला सल्लामसलतीचा अभिलेख, तज्ञ समूहाला किमान २१ दिवस आधी उपलब्ध करून देण्यात येईल. तज्ञ समूहाच्या सूचना आणि संबंधित विषयाबाबतची आस्था, त्यांचा सरळ संपर्क आणि संवादातून त्यांची इच्छा असेल तर त्यांचा प्रतिसाद मिळवण्यात येईल. तज्ञ समूहामध्ये संबंधित विषयाचे तज्ञ अथवा विशेष ज्ञान असलेले, जेणेकरुन धोरण प्रस्तावित करणे आणि त्यावर उपाय सुचवू शकतील अश्या व्यक्ती तसेच अंमलबजावणी यंत्रणेचे प्रतिनिधी सुध्दा असतील.

दुस-या टप्प्यामध्ये, सल्लामसलतीखालील अभिलेख, तज्ञ समूहाकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादानुसार अद्ययावत केले जातील आणि असे अद्ययावत अभिलेख तज्ञ समूहासमवेत सल्लामसलतीचा संक्षिप्त अहवाल लाभार्थी जनतेस प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील आणि किमान ३० दिवसांचा कालावधी देऊन त्यांचे अभिप्राय व सूचना मागविण्यात येतील.

लाभार्थी जनतेच्या हिताचे योग्यप्रकारे रक्षण नियामकाने करणे अपेक्षित असल्याने सल्लामसलत प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या सूचनांचा स्वीकार अथवा अस्वीकार करण्याचा नियामकाचा निर्णय अंतिम असेल.

## ३. कार्यपध्दती (Road Map) :

जलप्रशुल्क पध्दती ठरविण्यासाठी प्राधिकरण खालील धोरणात्मक मार्ग अवलंबेल.

३.१ "स्वीकृत परिचालन व परिरक्षण खर्च" निश्चिती.

३.२ वापराकरिता प्रवर्गाचे पुर्नविलोकन.

३.३ उपलब्ध माहितीवरून प्रवर्गीय पाणी वापराचा अंदाज

३.४ विशिष्ट निकषांवर आधारित वापराच्या प्रवर्गांमध्ये स्वीकृत परिचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी.

३.५ वापराच्या प्रवर्गांकरिता अधिनियमातील उद्देश (तरतुदी) विचारात घेऊन प्राधिकरणाने ठरविलेल्या प्रोत्साहने व दंडविषयक तरतुदी.

३.६ वापराच्या प्रवर्गाकरिता जलप्रशुल्काची निश्चिती.

## ४. "स्वीकृत परिचालन व परिरक्षण खर्च" निश्चिती :

वार्षिक परिचालन व परिरक्षण खर्चामध्ये जलसंपत्ती प्रकल्पांचे व्यवस्थापन खर्च, प्रशासकीय खर्च, कार्यचालन खर्च व परिरक्षण खर्च अंतर्भूत असलेल्या खर्चाचे घटक विचारात घेतले जातील. खेरीज, परिरक्षणाच्या खर्चामध्ये, परिचालन परिरक्षण खर्च व प्रतिबंधात्मक परिरक्षण खर्च दोन्हीही अंतर्भूत असतील.

(या सर्व परिभाषेच्या व्याख्या मार्गदर्शक सूचना, २०१९ मध्ये दिलेल्या आहेत).

विचाराधीन कालावधीकरिता वार्षिक प्रचालन व परिरक्षण खर्चाचा अंदाज ठोक पाणी पुरवठा गट प्राधिकरणास सादर करील. खर्चाचा अंदाज वेळेवर सादर न केल्यास उपलब्ध आधार सामुग्रीवरुन प्राधिकरण वाजवी खर्च निश्चित करील.

त्यानंतर, तज्ञ समुह आणि लाभार्थी जनतेशी सल्लामसलत केली जाईल.

सल्लामसलत प्रक्रियेतून प्राप्त झालेला प्रतिसाद विचारात घेऊन 'वसूल करावयाची प्रचालन व परिरक्षणाची रक्कम' प्राधिकरण निश्चित करील. अशाप्रकारे प्राधिकरणाने अंतिम केलेली खर्चाची रक्कम 'स्वीकृत खर्च' समजण्यात येईल.

**५. वापराकरिता प्रवर्गाचे पुनर्विलोकन :**

तज्ञ समूहासमवेत सल्लामसलत करुन प्राधिकरण, प्रचलित वापराकरिता प्रवर्गाचे पुर्नविलोकन करील आणि कृषी, घरगुती तसेच औद्योगिक या प्रचलित वापराकरिता प्रवर्गांमध्ये वाढ/घट/ सुधारणा करील.

लाभार्थी जनतेच्या यावरील सुचना, सल्लामसलतीचा अभिलेख प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन विचारात घेतला जाईल.

सल्लामसलत प्रक्रियेतून प्राप्त प्रतिसाद विचारात घेऊन प्राधिकरण वापराचा प्रवर्ग निश्चित करील.

**६. प्रवर्गनिहाय पाणीवापराची स्थिती :**

ठोक पाणीपुरवठा गट, त्यांच्या (दरनिश्चितीबाबत विनंती) अर्जासोबत विचाराधीन तसेच त्याआधीच्या नियंत्रण कालावधीशी संबंधित उपलब्ध साठवणूक सुविधा, स्थापित सिंचनक्षमता व त्या तुलनेत प्रत्यक्ष झालेले सिंचन, प्रवर्गनिहाय पाणीवापर, बाष्पीभवन व अन्य व्यय इ. आवश्यक ती सर्व संबंधित आधारभूत माहिती पुरवील. ठोक पाणीपुरवठा गटाकडून अशी माहिती प्राप्त न झाल्यास प्राधिकरण वार्षिक सिंचन स्थितीदर्शक अहवाल आणि अन्य उपलब्ध अद्ययावत आधारभूत माहितीचा यथोचित वापर करील.

प्राधिकरण विचाराधीन नियंत्रण कालावधीतील प्रवर्गनिहाय अंदाजित पाणीवापराची माहिती तपासेल.

त्यानंतर, प्रवर्गनिहाय पाणीवापराच्या अंदाजित परिमाणांवर प्राधिकरण, निवडक तज्ञ समुहासमवेत सल्लामसलत करील.

संबंधित माहिती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन लाभार्थी जनतेकडूनही अभिप्राय मागविण्यात येतील.

सल्लामसलत प्रक्रियेत प्राप्त प्रतिसादावर विचार करुन प्राधिकरण, प्रवर्गनिहाय पाणीवापराची विभागणी निश्चित करील.

**७. प्रवर्गनिहाय 'स्वीकृत खर्च' विभागणी :**

प्राधिकरण, पूर्वानुभवावर आधारित 'स्वीकृत खर्चाच्या' प्रवर्गनिहाय विभागणीचे प्रचलित निकषाचे पुनर्विलोकन करील आणि सुधारित निकषाचा प्रारुप तयार करील.

त्यानंतर, सुधारित निकषाच्या प्रारुपावर प्राधिकरण, निवडक तज्ञ समुहासमवेत सल्लामसलत करील.

सुधारित निकषाचा प्रारुप प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन लाभार्थी जनतेचे अभिप्रायही मागविले जातील.

सल्लामसलत प्रक्रियेत प्राप्त प्रतिसाद विचारात घेऊन आणि आवश्यक छाननी व चौकशी करुन प्राधिकरण, स्वीकृत खर्चाची प्रवर्गनिहाय विभागणी अंतिम करील. याबाबत प्राधिकरणाने घेतलेला निर्णय अंतिम, निष्कर्षात्मक व बंधनकारक असेल.

**८. प्रोत्साहने व दंड निर्धारण :**

तज्ञ समूह आणि लाभार्थी जनतेसमवेत सल्लामसलत करून अधिनियमातील विविध उद्देश लक्षात घेऊन प्रचलित सूट/प्रोत्साहने/दंड यांचे पुनर्विलोकन प्राधिकरण करील आणि तसे करताना पूर्वीच्या निर्णयाच्या परिणामाच्या अभ्यासातील निष्कर्ष/शिफारशी सुध्दा विचारात घेईल.

सल्लामसलत प्रक्रियेत प्राप्त प्रतिसाद विचारात घेऊन प्राधिकरण, प्रवर्गनिहाय विविध प्रोत्साहने/दंड निश्चित करील. याबाबत प्राधिकरणाने घेतलेला निर्णय अंतिम, निष्कर्षात्मक व बंधनकारक असेल.

**९. ठोक जल प्रशुल्क निर्धारणाचे निकष :**

वरील परिच्छेद ४ ते ८ मध्ये दिलेल्या सल्लामसलत प्रक्रियेअंती दर निर्धारणाचे निश्चित केलेली तत्त्वे "ठोक जल प्रशुल्क निर्धारणाचे निकष" म्हणून अभिलेखित केली जातील आणि प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर ठेवून सर्वांना माहितीसाठी उपलब्ध करुन दिली जातील.

**१०. प्रवर्गनिहाय जल प्रशुल्काचे निर्धारण :**

सल्लामसलत प्रक्रियेअंती निश्चित केलेल्या प्रवर्गनिहाय स्वीकृत खर्चाची विभागणी, प्रवर्गनिहाय पाणी वापराची विभागणी आणि निकष यांच्या आधारे प्राधिकरण प्रवर्गनिहाय ठोक जल प्रशुल्काचे प्रारुप तयार करील. प्राधिकरण दस्ताऐवजामध्ये कारणांची नोंद करुन विविध स्त्रोतांकरिता प्रवर्गनिहाय ठोक जल प्रशुल्कामध्ये बदल करु शकेल.

लाभार्थी जनतेचे आणि ठोक पाणीपुरवठा गटाचे अभिप्राय, ठोक जल प्रशुल्क प्रारुप प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर किमान ३० दिवसांकरिता ठेवून मागविण्यात येतील.

सल्लामसलत प्रक्रियेतील प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन प्राधिकरण, प्रवर्गनिहाय ठोक जल प्रशुल्क निश्चित करील. जलदराच्या आदेशामध्ये विचाराधीन कालावधीकरिता दरातील वार्षिक वाढीची तरतूद अंतर्भूत असेल. या संबंधीचा प्राधिकरणाचा निर्णय अंतिम आणि निष्कर्षात्मक असेल. अशाप्रकारे अंतिम केलेल्या दराबाबतचे आदेश प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर ठेवून जनतेस उपलब्ध केले जातील.

**११. प्रशुल्क आदेशाची अनुज्ञेयता :**

प्रशुल्क आदेश सलग ३ जललेखा वर्षांकरिता अनुज्ञेय राहील. ज्या जललेखा वर्षामध्ये आदेश निर्गमित केले असतील त्या वर्षापासून सलग ३ वर्षांकरिता अनुज्ञेय राहतील. प्राधिकरण, विशिष्ट कारणे नमूद करुन प्रशुल्क आदेशांच्या नियंत्रण कालावधीत वाढ करु शकेल. वार्षिक वाढीसह अथवा विनावाढीसह प्राधिकरणाचे प्रशुल्क आदेश राज्यातील संबंधित कार्यक्षेत्रातील सर्व ठोक पाणीपुरवठा गटांना आणि ठोक पाणीपुरवठा वापरकर्त्यांना अथवा कोणत्याही संबंधित गटास लागू राहील.